**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
सुविड फाउंडेशन, रिसोड
वाशिम

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 11-10-2024

वॉशिम(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-10-11 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2024-10-12 | 2024-10-13 | 2024-10-14 | 2024-10-15 | 2024-10-16 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 26.3 | 25.4 | 23.4 | 22.4 | 20.1 |
| कमाल तापमान (अं.से) | 34.6 | 33.5 | 34.8 | 35.7 | 33.7 |
| किमान तापमान (अं.से) | 24.3 | 24.2 | 25.1 | 25.8 | 24.6 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 89 | 92 | 88 | 88 | 89 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 61 | 66 | 61 | 53 | 62 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11 | 5 | 2 | 4 | 9 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 143 | 107 | 109 | 69 | 38 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 6 | 8 | 7 | 7 | 8 |

## हवामान सारांश / चेतावणी:

वाशीम जिल्ह्यात भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरच्या जिल्हास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार पुढील ५ दिवस आकाश अंशतः ढगाळ ते ढगाळ राहून दिनांक १२ ऑक्टोबर रोजी बहुदा सर्वत्र ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता, दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी विरळ ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता तसेच दिनांक १४ ते १६ ऑक्टोबर २०२४ दरम्यान एक ते दोन ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • पुढील ५ दिवसात कमाल तापमान ३३.५ ते ३५.७ अंश सेल्सियस तर किमान तापमान २४.२ ते २५.८ अंश सेल्सियस राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. •सतर्क ईशारा: दिनांक १२ आणी १३ ऑक्टोबर २०२४ दरम्यान एक ते दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• रब्बी हंगामाकरिता वांगी, टोमाटो, मिरची, कोबी व फुलकोबी बियाण्याची गादी वाफ्यावर पेरणी करावी. हरभरा पेरणी पूर्वी रायझोबियमव पीएसबी जीवाणू संवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. •फवारणी स्वच्छ वातावरण व हवा कमी असलेल्या वेळेत करावी. •हरभरा पिकाची पेरणी रुंद वरंबा सरी पद्धतीने करावी ज्यामुळे बियाण्याचे प्रमाण इतर पेरणी पद्धतीच्या तुलनेत कमी लागतेव आंतरमशागतीची कामे सहजपणे करता येतात.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

•हरभरा पेरणी पूर्वी रायझोबियम व पीएसबी जीवाणू संवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | •परिपक्व अवस्थेतील सोयाबीन पिकाची काढणी व मळणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. पावसाची शक्यता असल्याने मळणी करणे शक्य नसल्यास ताडपत्रीच्या/प्लास्टिक शीटच्या साहाय्याने झाकून ठेवावे. •सोयाबीन पिकाची मळणी करतांना मळणी यंत्राचे फेरे ३५० ते ४०० प्रती मिनिट असतांना सोयाबीनची मळणी करावी जेणेकरून सोयाबीनची उगवण क्षमता टिकून राहील. |
| ज्वारी | •खरीप ज्वारी पीकाची काढणी व मळणी करुन घ्यावी तसेच मळणीनंतर धान्यास उन द्यावे व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी मळणी ची कामे शक्य नसल्यास ताडपत्रीच्या साहाय्याने झाकून ठेवावे. |
| मका | •परिपक्व मका पिकाची काढणी व मळणी करून घ्यावी तसेच मळणीनंतर धान्यास उन द्यावे व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. मळणी ची कामे शक्य नसल्यास ताडपत्रीच्या साहाय्याने झाकून ठेवावे. |
| तीळ | • तीळ पिकाची/ झाडाची पाने व बोन्ड्या पिवळी पडू लागल्यास पिक कापणीस सुरवात करावी,कापणीनंतर पेंड्या बांधून त्या उभ्या रचून ठेवाव्यात, ३ ते ४ दिवस बोन्ड्या वळल्यानंतर मळणी करावी.• मळणी नंतर बियाणे स्वच्छ करून उन्हात वाळवून सुरक्षित ठिकाणी साठवावे. |
| कपाशी | • कपाशीची पाने लालसर झाल्यास २ किलो डीएपी + १ किलो मॅग्नेशियम सल्फेट किवा १ किलो पोटेशीअम नायट्रेट १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कपाशी पिकात फुल अवस्थेत शेंदरी बोंड अळीच्या नियमित सर्वेक्षण करून कीटकनाशकाची फवारणी करण्या अगोदर कीडग्रस्त फुले वेचून नष्ट करावी व जिथे १० टक्केच्या वर नुकसान झाले आहे तेथे प्रोफेनोफॉस ५०टक्के ईसी २० मिली किंवा क्लोरोपायरीफॉस ५० टक्के ईसी २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कपाशी पिकावरील रसशोषक किडीच्या ( मावा,तुडतुडे,पांढरी माशी,फुलकिडे) प्रादुर्भाव आढळून आल्यास आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ ईसी २० मिली प्रती १० लिटर पाणी किंवा फ्लोनिकामिड ५० डब्ल्यूजी ४ ग्राम किंवा ईमीडाक्लोप्रीड १७.८ टक्के एस.एल २.५ मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी स्वच्छ वातावरण व हवा कमी असलेल्या वेळेत करावी. |
| तूर | •तूर पिकात आंतरमशागतीची कामे करून पिक तण तणविरहीत ठेवावे.• तूर पिकामध्ये हेक्टरी किमान ४-५ कामगंध सापळे लावावे. या सापळ्या मध्ये अडकलेले नर पतंगवेळोवेळी काढून नष्ट करावे तसेच विशिष्ट कालावधीत वड्या (ल्युर) बदलावे. •तूर पिकावरील पानेखाणा-या अळ्यांच्या नियंत्रणासाठी दर १५ दिवसांनी निंबोळी अर्काची ५० मि.ली प्रती १० लिटर पाण्यातस्वच्छ वातावरण असतांना फवारणी करावी तसेच पिकामध्ये ठिकठिकाणी पक्षी थांबे उभारावेत त्यावरपक्षी बसून अळ्यांना टिपतात. • तूर पिकामध्ये नियमित निरीक्षण करावे त्याच बरोबर मर रोगाचीलक्षणे दिसून / आढळून आल्यास प्रादुर्भाव ग्रस्त झाडे उपटून शेताबाहेर नष्ट करावीत. फवारणी स्वच्छ वातावरण व हवा कमी असलेल्या वेळेत करावी. |
| करंडई | •कोरडवाहू रबी करडईची सप्टेबरच्या शेवटच्या ते आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पेरणी केल्यास मावा किडीचा प्रादुर्भाव अल्प राखण्यास मदत होते. पेरणी स्वच्छ वातावरण व शेतात वाफसा असतांना करावी, त्याकरीता पीकेव्ही पिंक (ऐकेएस-३११), आयएसएफ -७६४,एकेएस-२०७ व नारी- बिनकाटेरी (एनएच-१ ) वाणाची निवड करावी. •पेरणीपूर्वी बीज प्रक्रियेसाठी जैविक खते व बुरशीनाशके जसे अझोटोबेक्टर + पीएसबी २० ग्राम व ट्रायकोडर्मा ४ ग्राम / किलो या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. •पेरणीकरतांना दोन ओळीतील अंतर ४५ सें.मी. ठेवावे. •आंतरपीक पद्धतीमध्ये करडई + हरभरा ६:३ किंवा करडई + जवस ३:३ या प्रमाणे पेरणी करावी. |
| ज्वारी | •कोरडवाहू रबी ज्वारी पेरणीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. •कोरडवाहू रबी ज्वारीची पेरणी २५ सप्टेबर ते १५ ऑक्टोबर दरम्यान करावी, पेरणी स्वच्छ वातावरण व शेतात वाफसा असतांना करावी त्याकरीता पीकेव्ही क्रांती (एकेएस व्ही १३), फुले यशोदा (एस पीव्ही १३५९ ), मालदांडी ३५-१ या वाणांची निवड करावी. तसेच पिकामध्ये नात्र स्थिर करण्याकरीता व स्फुरद उपलब्ध होण्यासाठी अझोटोबेक्टर + पीएसबी २५ ग्राम प्रती किलो व मातीतील बुरशीजन्य रागापासून बचावासाठी ट्रायकोडर्मा ४ ग्राम प्रती किलो या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. •दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी तर दोन रोपातील अंतर २० सेंमी या प्रमाणे पेरणी करावी. •पेरणी सोबत हेक्टरी ५०:२५:२५ किलो नत्र, स्फुरद, पालाश द्यावे. • कोरडवाहू रबी ज्वारीला पेरणी करीता बियाणे हेक्टरी ७.५ ते १० किलो वापरावे. |
| हरभरा | •कोरडवाहू हरभऱ्याची पेरणी १५ आक्टोबर पर्यंत करावी. त्याकरीता वाण जाकी ९२१८, विजय,पीडीकेव्ही कांचन (एकेजी-११०९) हे वाण उपयुक्त आहेत. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्फुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगापासून बचावासाठी रायझोबियम व पीएसबी जीवानुसवर्धक २५ ग्राम व ट्रायकोडर्मा ५ ग्राम प्रती किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सिताफळ | • नविन लागवड केलेल्या सीताफळ बागेस आवशकतेनुसार ओलीत करावे. •पूर्ण वाढलेल्या व काढणीस तयार असलेल्या सीताफळ फळांची काढणी करून प्रतवारी करून बाजारपेठेत |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | पाठवावी. |
| संत्रा | •मृग बहरातील फळांचा आकार वाढण्यासाठी १ ग्राम २-४ डी किंवा जिब्रेलिक ऍसिड याची २ टक्के मोनो पोटाशिअम फॉस्फेट, डायअमोनियम फॉस्फेट, पोटाशीअम नायट्रेट आलटून-पालटून १५ दिवसाच्या अंतराने झाडावरील भार अंदाज घेऊन फवारणी करावी. नमूद फवारणीची कामे स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून करावी. • आंबिया बहराच्या परिपक्व फळांची काढणी करावी. •संत्राच्या झाडाचे आळे तण विरहीत ठेवावे. |
| कांदा | •कांदा लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी गादी वाफ्यावर रोपे तयार करण्यास सुरुवात करावी लागवडीसाठी भीमा सुपर, भीमा रेड, भीमा राज ,एन-५३ इत्यादी सुधारित वाणाची निवड करावी. कांद्याच्या १ हेक्टर क्षेत्राच्या लागवडीसाठी, रोपवाटिकेत गादी वाफ्यावर कांद्याचे १० किलो बियाणे १० गुंठे क्षेत्रात पेरावे. |
| वांगे | • भाजीपाला पिकास तापमान वाढल्याने पिकाला गरजेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. •वांगी पिकात फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही या कीटकनाशकाची ३ मिलि प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पाऊस नसताना स्वच्छ वातावरणामध्ये करावी. |
| टोमॅटो | • सद्यस्थितीत ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून असल्यास नियंत्रणासाठी मॅनकोझेब ७५डब्लूपी. २५ ग्राम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०डब्लूपी. २५ग्राम, १०लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलकिडे आणि पांढऱ्यामाशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्राव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट३०टक्के प्रवाही१०मिली प्रती१०लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.फवारणी स्वच्छ वातावरण व हवा कमी असलेल्या वेळेत करावी. |
| मिरची | •तापमानातील चढ उतार व उतार यामुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी पाण्यात मिसळणाऱ्या गंधकाची २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | •विजांचा कडकडाटासह मेघगर्जनाहोण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. • रब्बी हंगामात चा-यासाठी मका पिकाची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात करावी. लागवडीसाठी आफ्रिकन टॉल, मांजरी, विजय या जातीची निवड करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |